# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

**''राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना''**

**महाविद्यालयांनी Institute Profile अद्ययावत करून मान्यता घेण्याबाबत**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, मान्यताप्राप्त व्यवसायिक व बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमामध्ये शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी ''राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना'' व ''डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना'' तसेच मागासवर्ग प्रवर्गासाठीच्या शासनाच्या विविध शिष्यवृत्ती/फ्रिशिप योजना https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत.

शासनाने दिलेल्या सुचनेनुसार महाविद्यालयांचे Institute Profile अद्ययावत करून मान्यता घेणे बंधनकारक आहे. याबाबत शासन व विद्यापीठाने वेळोवेळी सुचना दिलेल्या आहेत. तसेच शासनाने मान्यता देण्यासाठी वेळोवेळी शिबीराचे आयोजन केलेले आहे. तथापी, अद्यापही काही महाविद्यालयांनी याबाबत कार्यवाही केलेली नाही. अशा महाविद्यालयांनी दि. ३१/१०/२०१८ पूर्वी Institute Profile त्वरीत अद्ययावत करून मान्यता घेण्याबाबत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी दि. २७/१०/२०१८ रोजी विद्यापीठात घेतलेल्या आढावा बैठकीत स्पष्ट सुचना दिलेल्या असुन जी महाविद्यालये यासंदर्भात कार्यवाही करणार नाहीत अशा महाविद्यालयावर उचित कारवाई करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

तरी, अद्ययावत केलेल्या Institute Profile ला मान्यता घेऊन जास्तीस जास्त विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल याची काळजी घेण्यात यावी. सदर योजनेपासून विद्यार्थी वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहिल याची नोंद घ्यावी.

29/10/2018

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड पुणे – ७ }
संदर्भ : शै. प्रवेश/४५४४ }
दिनांक : २९/१०/२०१८ }

प्रत:

मा. प्राचार्य/संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये/संस्था.

Desktop/MAHADBT 2018 19/MAHADBT Circular 2018 19